

### अंबानी आणि राधिका मर्चंट यांचा साखरपुडा

**मुंबई** : रिलायन्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांचा लेक अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांचा साखरपुडा पार पडला. मुंबईतील अँटिलिया बंगल्यामध्ये अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांनी एकमेकांना अंगठ्या परिधान केल्या. साखरपुड्यासाठी अँटिलिया रोषणाईनं उजळलं होतं. अनंत आणि राधिका यांचा साखरपुडा पारंपारिक रितीरिवाजाप्रमाणे पार पडला.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड


### राखी सावंतची पोलीस ठाण्यातून सुटका



**मुंबई** : अभिनेत्री राखी सावंतला आज आंबोली पोलिसांनी आज ताब्यात घेऊन सहा तासाच्या चौकशी केल्यानंतर सोडून दिलं आहे. एका अभिनेत्रीनं राखी सावंत विरोधात तक्रार केली होती. त्यानंतर राखील आज पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. सहा तास चौकशी केल्यानंतर पोलिसांनी राखीला सोडून दिले आहे. राखी सावंत यांनी आज पोलिसांची चौकशीमध्ये सहकार्य केलं असल्याचं पोलिस सूत्रांकडून समजलं आहे. शिवाय राखी सावंतनं चौकशीसाठी तिचा मोबाईल सुद्धा पोलिसांना दिल्यामुळे पोलिसांनी आज ६ तास तपास केल्यानंतर राखी सावंतला सोडून दिलं. राखी सावंत आंबोली पोलीस स्टेशनमधून हात जोडून बाहेर निघाली. आंबोली पोलिसांनी राखीला ताब्यात घेतलं होतं. राखी सावंतवर एका महिला मॉडेलचा आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटो व्हायरल केल्याचा आरोप होता.


www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.२० जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ११५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# गड्डा जत्रेत पोलीस चौकीसमोर थरार; चाकू हल्ल्यात बिहारी तरुण ठार

## ५ हजारांच्या उधारीवरुन केले सपासप वार; चौघे ताब्यात

**सुराज्य/सोलापूर**

**होम मैदानाजवळ भरलेल्या गड्डा जत्रेत गुरूवारी दुपारी भयानक थरार घडला.कॉस्मेटिक वस्तूंचा स्टॉल टाकलेल्या तरूणांच्या दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. त्यानंतर चाकू घेवून एकमेकांच्या अंगावर धावून गेले. छातीत चाकू भोसकल्याने एका तरूणाचा रक्ताच्या थारोळ्यात जागीच मृत्यू झाला. भांडण सोडवण्यास आलेल्या काही तरूणांवरही मारेकऱ्यांनी शस्त्राने हल्ला केला. त्यात तिघेजण जखमी झाले. मार्केट पोलीस चौकीसमोरच्या चौकात ही गँगवारची घटना घडली. त्यानंतर आजूबाजूचे दुकानदार घाबरून आपला व्यवसाय बंद करून निघून गेले. घटनास्थळी पोलीस येण्यापूर्वीच आरोपींनी तेथून पलायन केले. अतिकसाह अख्तरसाह( वय २१ रा.मु.पो.डुमरी, जिल्हा कैंम्हूर, बिहार) असे हत्या झालेल्या तरूणाचे नाव आहे. पोलिसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवली आणि अक्कलकोटहून गुलबर्ग्याकडे जात जात असताना सायबर कक्षाच्या मदतीने चार आरोपींना ताब्यात घेतले. पाच हजारांची उधारी त्या तरूणाच्या जिवावर बेतली.**



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की- श्री सिध्देश्वर यात्रेत दरवर्षी गड्डा जत्रा भरली जाते. तब्बल महिनाभर या यात्रेत उत्तर प्रदेश, बिहार कर्नाटक येथील छोटे-मोठे व्यापारी आपल्या वस्तू विकण्याकरिता या जत्रेत येत असतात. गेल्या अनेक वर्षांपासून उत्तर प्रदेश, बिहारमधील तरूण स्टॉल थाटत असतात. मागील दोन वर्षे कोरोनामुळे गड्डा जत्रा भरलेली नव्हती पण यंदा मात्र गड्डा यात्रा मोठ्या प्रमाणात भरली आहे. खून झालेला युवक आपल्या दहा-बारा मित्रांसमवेत बिहार वरून येथे घड्याळ विक्रीसाठी आला होता तर मारहाण करणाऱ्या एका युवकाचा कपड्याचा स्टॉल होता. दोघांचीही दुकाने जवळजवळ आहेत. शेजारच्या एका युवकाने मयत आतिफसाह यास ५ हजार रुपये तीन-चार दिवसांपूर्वी उसने दिले होते. पैशाच्या देण्याघेण्यावरून बुधवारी रात्री या ठिकाणी भांडणे झाली होती. गुरुवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पैसे मागितले असता पैसे न दिल्याने कडाक्याने भांडण सुरू झाले. उधारी दिलेल्या युवकाचे मित्र शस्त्र घेवून आले. त्यातील एकाने आतिफसाह याला दुकानासमोरील रस्त्यावरच भोसकले. घाव छातीतून आरपार गेल्याने आसिफसाह जागेवरच कोसळून रक्ताच्या थारोळ्यात पडला. बाकीचे तिघे भांडण सोडविण्यास गेले असता त्यांच्यावरही हल्ला करून दोया तिघा मारेकऱ्यांनी तेथून पोबार केला. प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले की,मारणारे तिघे -चौघे होते. ही घटना कळताच फौजदार चावडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील व त्यांचे पथक त्या ठिकाणी दाखल झाले तसेच सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्षीरसागर हेही त्या ठिकाणी पोहचले. काही वेळाने शासकीय रुग्णालयातून ॲम्बुलन्स घटनास्थळी आली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरूणाचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला तर जखमींना उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. अतिफसाह अख्तरसाह (वय-२१, रा.डुमरी, कबीलासपूर दुर्गावती जि.कैम्हुर, बिहार) असे खून झालेल्या युवकाचे नाव असून या भांडणात तबरेजसाह इस्तीयाक मौलाना साह (वय-३२.रा.फकराबाद कुदारा जि.कैम्हुर, राज्य-बिहार) आदिलसहा अयाजसाह (वय-१८, रा.डुमरी कबीलासपूर, जि. कैम्हुर, राज्य -बिहार) व परवेशसाह समृध्दीसाह (वय-३२, रा. डुमरी, कबीलासपूर दुर्गावती, कैम्हुर, बिहार) अशी जखमींची नावे आहेत आहे.

### आरोपींच्या अशा आवळल्या मुसक्या

खून करून पळून जाताना संशयित आरोपी अक्कलकोट मार्गे वागदरीहून गुलबर्ग्याकडे जात असताना गुन्हे शाखेच्या पथकाने शिरशी या गावाजवळ अवघ्या दोन तासात त्यांना पकडले. संशयित आरोपींकडे मोबाईल होते. सायबर कक्षाच्या मदतीने आरोपींचा इंटरनेट चालू असल्याने ते सहज जाळ्यात सापडले. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दोरगे व पोलीस निरीक्षक संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही कामगिरी बजावली. प्रथम चौकशीत चारही आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली असल्याचे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांनी 'सुराज्य'शी बोलताना सांगितले.आरोपींची नावे गोपनिय ठेवण्यात आली असून रात्री उशिरापर्यंत त्यांची कसून चौकशी सुरू होती. चारही आरोपी बिहारी असल्याचे समजते.

## रेवेवाडी येथील सरपंचाला मिटिंगमध्ये मारहाण; रेशन दुकानदारावर गुन्हा

**सोलापूर** : दक्षता कमिटीच्या मीटिंगमध्ये रजिस्टर का आणले नाही अशी विचारणा केल्याच्या कारणावरून सरपंचास खुर्ची आणि लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आली. ही घटना रेवेवाडी (ता.मंगळवेढा) येथील ग्रामपंचायत कार्यालयात बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी रेशन धान्य दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात रेवेवाडीचे चे सरपंच ब्रह्मदेव दाजी रेवे (वय ४६) यांनी मंगळवेढा पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी धान्य दुकानदार सहदेव अर्जुन लवटे आणि चंद्रकांत मारुती लवटे (दोघे रा.रेवेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास रेवेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात दक्षता कमिटीची बैठक भाऊसाहेब संकपाळ (तलाठी) यांच्या उपस्थित चालू होती. त्यावेळी सरपंच रेवे यांनी रेशन दुकानदार सहदेव लवटे यांना दुकानाचे रजिस्टर का आणले नाही? अशी विचारणा केली. तेंव्हा मी रजिस्टर दाखवत नाही. असे सहदेवने सांगितले.

त्यावेळी सरपंचानी रेशन दुकान चांगल्या शिकलेल्या माणसास चालवण्यास द्यावे असे सांगितले. त्यानंतर दोघांनी मिळून प्लास्टिकची खुर्ची आणि लाथाबुक्याने सरपंचांना मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार काळे करीत आहेत.

### २९ आठवड्यांनंतर गर्भपात होऊ शकतो का?; न्यायालयाने स्थापन केली समिती

**नवी दिल्ली** : २९ आवड्यांच्या गर्भपाताला परवानगी देता येऊ शकते का याची चाचपणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एम्स् डॉक्टरांची समिती स्थापन केली आहे. २९ आठवड्यांचा गर्भपात महिलेसाठी सुरक्षित आहे का याचा अहवाल डॉक्टरांच्या समितीने द्यावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याप्रकरणी २० वर्षीय अविवाहित तरुणीने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली आहे.

## बार्शी कोर्ट आवारातून पोलिसांच्या ताब्यातून आरोपीचे पलायन

**बार्शी** : न्यायालयीन कोठडीतील आरोपीस कोर्टात हजर करून कोर्ट आवारात आणल्यानंतर आरोपीने पोलिसांना चकवा देऊन बेडीसह पळून गेल्याची घटना २ च्या सुमारास बार्शी न्यायालयाच्या प्रांगणात घडली.

सिध्देश्वर शिवाजी केचे (वय २४ रा. बारलोणी ता.माढा) असे पळून गेलेल्या आरोपीचे नांव आहे. पो.ना. मोतीराम पवार यांनी याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सिध्देश्वर केचे हा एका गुन्ह्यात अटक होऊन नंतर तो न्यायालयीन कोठडीत आहे. सध्या त्यास सोलापूर येथील मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे. त्याला व आणखी एका महिलेला न्यायालयात हजर करण्यासाठी बार्शीला घेऊन जाण्याची जबाबदारी मोतीराम पवार, बाबूराव गलांडे व महिला पोलीस कर्मचारी नादिया पत्तेवाले यांच्यावर सोपविण्यात आली होती. सदरच्या दोघांना सोलापूर कारागृहातून ताब्यात घेऊन पोलीस कर्मचारी एस.टी.बसने बार्शीला आले. कोर्टात हजर केल्यानंतर पुढील तारीख दिली. त्यानंतर ते कोर्ट आवारात आरोपीस बेड्या लावून उभे होते. त्यावेळी आरोपीने लघुशंकेचा बहाणा केला. त्यास लघुशंकेसाठी घेऊन जाताना त्याने पो.ना. पवार यांच्या हातास हिसका मारून कोर्टाच्या पाठीमागील बाजूस बेडीसह पळून गेला. अशा आशयाची फिर्याद दिली आहे. अधिक तपास सपोनि ज्ञानेश्वर उदार करत आहेत.

## पंढरपुरात पेपर लिहिताना नऊ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू



**सुराज्य/पंढरपूर**

आज कालच्या धकाधकीच्या जीवनात शैक्षणिक आणि आर्थिक स्पर्धेत मोठी वाढ झाली आहे. यातूनच पालक अनावधानाने आपल्या पाल्यांवर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळेच मुलांमध्ये कमी वयात मोठा ताण तणाव निर्माण झालेला आहे. आणि तो सध्या लहान मुलांमध्ये जाणवतो. मुलांच्या यशस्वी जीवनाचा पाया हा उत्तम शारीरिक आणि मानसिक आरोग्य आहे उत्तम शारीरिक आरोग्यासाठी योग्य आहार आणि व्यायाम तसेच मानसिक शांततेची गरज आहे. मुलांनी एखादा छंद किंवा कला जो असावी.

**- डॉ.शुभांगी तनपुरे**, एमबीबीएस

पाल्य आजारी असल्यास पालकांनी पाल्यास शाळेत पाठवू नये. आजारी पाल्य शाळेत पाठवल्यास शाळेतील मुलांना व्हायरल इन्फेक्शन पोहोचण्याचा धोका असतो. त्यामुळे पालकांनी स्वतः खबरदारी घ्यावी. पाल्याचे शिक्षण पुन्हा करता येईल मात्र पाल्याच्या जीवास धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करू नये. स्पर्धेत टिकण्यासाठी पालकांनी पाल्यास मानसिक शारीरिक ताण तणाव देऊ नये.

**- बाहुबली गांधी**, पालक-अरिहंत पब्लिक स्कूल

अरिहंत पब्लिक स्कूलमध्ये तिसऱ्या इयत्तेत शिकणारी अनन्या भादुले हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. शाळेमध्ये पेपर सोडवत असताना अनन्याला चक्कर आली. शाळेतील शिक्षकांनी तातडीने तिला दवाखान्यात नेले. मात्र यामध्ये तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती तिचे नातेवाईक ॲड राजेश भादुले यांनी दिली आहे.

दरम्यान, याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू म्हणून नोंद झाली आहे. येथील अरिहंत पब्लिक स्कूल मध्ये दुर्दैवी घटना घडली. शाळेत घटक चाचणी सुरू होती. इयत्ता तिसरी मध्ये शिकत असलेली अनन्या अतुल भादुले ही पेपर सोडवत होती. पेपर सुटण्यास काही वेळ शिल्लक असताना तिला अचानक चक्कर आली. ही बाब वर्गातील शिक्षकांच्या लक्षात आल्यावर तिला तातडीने दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आले. तसेच तिच्या पालकांशी संपर्क केला. मात्र दवाखान्यात उपचार करण्यापूर्वी तिचा मृत्यू झाला. अनन्याच्या मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्याने मृत्यू झाला असावा अशी प्राथमिक माहिती आहे. शवविच्छेदनाचा अहवाल येणे बाकी आहे. शहर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू अशी नोंद झाली आहे.तिला दोन दिवसापूर्वी ताप होता अशी माहिती आहे. असे असले तरी अवघ्या नऊ वर्षीय विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# 'दिल्ली, महाराष्ट्र आणि मुंबईत एकच सरकार हवे'

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण तर कर्जच घेतलं नाही, मग आपल्याला काय मिळेल?

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

**सुराज्य/मुंबई**

## • पंतप्रधान मोदींनी दौऱ्यात मुंबई महापालिकेचे रणशिंग फुंकले



मुंबईत विकास कामे जलद गतीने करण्यासाठी भाजप आणि एनडीएच्या सरकारला पाठिंबा द्या. मुंबईत २०१४ पासून विकासकामांना गती मिळाली. मात्र, मधल्या काही काळात विकासाचा वेग मंदावला होता. पण पुन्हा शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात पुन्हा विकासाला वेग आला आहे'', असं म्हणत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली, महाराष्ट्र आणि मुंबईत एकच सरकार हवे असे सांगत मुंबई महापालिकेचे रणशिंग फुंकले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरूवारी मुंबईत विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले ''डबल इंजिन सरकारमुळे महाराष्ट्र आणि मुंबईचा अभूतपूर्व विकास होत आहे. येत्या २५ वर्षांत राज्यातील अनेक शहर देशांच्या विकासाला चालना देणार आहेत. मुंबईला भविष्यासाठी तयार करायचे आहे. हे काम शिंदे-फडणवीसांच्या माध्यमातून होत आहे. शिंदे-फडणवीस यांच्या जोडीचे सरकार येताच मुंबईत कामांना वेग आला आहे. महाराष्ट्रामध्ये सर्व काही ट्रॅकवर येत आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस यांना धन्यवाद देतो'', असं ते म्हणाले. यावेळी गेल्या वर्षीच्या डिसेंबर महिन्यात समृध्दी महामार्गाचं लोकार्पण झालं आहे. आता मेट्रोचा हा सोहळा आपण करतो आहोत.

समृध्दी महामार्गामुळे नागपूर आणि मुंबई जोडलं गेलं. मेट्रोच्या रूपाने आमचं दुसरं स्वप्न पूर्ण झालं आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले उपमुख्यमंत्री यांनी पंतप्रधान मोदींचं कौतुक करत फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी जगातील सर्वात लोकप्रिय नेते आहेत. पंतप्रधान मोदी सगळीकडेच लोकप्रिय आहेत पण दाव्यासह सांगतो की, लोकप्रियतेची कोणती स्पर्धा झाली तर आपल्या लोकप्रियतेमध्ये नंबर १ वर मुंबई असेल. एवढं प्रेम मुंबईकरांचं तुमच्यावर आहे, असे सांगितले.

### बेरोजगारीच्या प्रश्नांवर मोदींचे मौन, पटोलेंची टीका

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणाचा समाचार घेताना नाना पटोले म्हणाले की, देशात अनेक वर्ष फक्त गरिबीच होती असा आरोप करताना मोदी सरकारच्या काळात गरिब आणखी गरिब झाला याचे जाणीव मोदींनी कशी झाली नाही. आपले सरकार देशातील ८० कोटी लोकांना रेशनवर मोफत धान्य देते असे मोदी स्वतःच सांगतात. देशातील गरिबी कमी झाली आहे असे मोदींना म्हणायचे असेल तर हे ८० कोटी गरिब आले कोठुन ? एकूणच मोदींनी नेहमीप्रमाणे प्रचारमंत्रीपदाला साजेशे प्रचारी भाषण केले.

### कर्नाटकवर कोट्यवधींच्या योजनांची बरसात

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नारायणपूर डाव्या काठाच्या कालव्याचा विस्तार, नूतनीकरण आणि आधुनिकीकरण प्रकल्पाचे उद्घाटन केले. यावेळी मोदी म्हणाले की, कलबुर्गी, यादगिरी आणि विजयपूर जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना नारायणपूर डाव्या किनारी कालव्याच्या विस्ताराचा थेट लाभ मिळणार आहे. कर्नाटकात येणाऱ्या सुरत-चेन्नई इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या भागाचे कामही आज सुरू झाले आहे. यामुळे कलबुर्गी आणि यादगिरीमध्ये राहण्याच्या सुविधेत वाढ होणार असून, अनेक लोकांना इथे राहायला मिळेल, असे त्यांनी सांगितले.